दि. 08/03/2023

1) म.टा.पृ. पान क्र. 1

**मटा अँकर** समुपदेशाने कौटुंबिक वाद मिटवून शेकडो संसार पुन्हा आणले रूळावर

# वर्दीतील स्त्रीशक्तीने पुन्हा जोडली मने

**भाविक पाटील**, मिरा-भाईंदर

महिलांवरील हिंसाचार व महिलांशी संबंधित इतर प्रकरणांत दुराव्यामुळे संसार तुटण्याच्या मार्गावर येतात. परंतु त्यापूर्वीच योग्य समुपदेशन करत पुन्हा मने जोडून देण्याचे आव्हान मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या संवेदनशील 'भरोसा सेल' शाखेची एका पोलिस महिला अधिकारी समर्थपणे पेलत आहे. या अधिकाऱ्याने मागील दीड वर्षांत शेकडो संसार पुन्हा रूळावर आणले आहेत.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर विविध पोलिस ठाण्यांमध्ये महिलांवरील हिंसाचार व कौटुंबिक वादाच्या अनेक घटनांची नोंद होत असल्याचे निदर्शनास येत होते. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल होण्यापूर्वीच महिलांशी संबंधित तक्रारींचे निवारण, हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना मानसिक आधार देणे, कौटुंबिक वादविवादाची प्रकरणे कुटुंब तुटण्यापूर्वी मिटवणे या उद्देशाने 'भरोसा सेल'ची स्थापना दीड वर्षांपूर्वी करण्यात आली आहे. तेव्हापासून या शाखेची जबाबदारी सहाय्यक पोलिस निरीक्षक तेजश्री रोहिदास शिंदे यांच्याकडे देण्यात आली आहे.



महिलांशी संबंधित प्रकरणे आल्यास सहायक निरीक्षक तेजश्री शिंदे त्या महिलेचे तसेच समोरच्या व्यक्तीचे सहकारी डॉक्टर आणि वकिलांच्या मार्फत समुपदेशन करतात. त्यानंतर पती-पत्नी किंवा भाऊ-बहीण यांच्यामधील दुरावा दूर करण्यासाठी केक कापून पुन्हा एकत्र आल्याचा आनंद साजरा करतात. मने पुन्हा जुळावीत, यासाठी हॉटेलमध्ये जेवण्याची व्यवस्था किंवा चित्रपट पाहण्यासाठी तिकिटे काढून देणे अशा मार्गांचाही अवलंब केला जातो. अशा संवेदनशील कामकाजामुळे या 'भरोसा सेल'ला चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्यातील इतर पोलिस आयुक्तालयांच्या हद्दीतील 'भरोसा सेल'च्या तुलनेत हा प्रतिसाद मोठा असल्याचे सांगितले जाते. मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाच्या 'भरोसा सेल'मध्ये आतापर्यंत बाराशेहून अधिक अर्ज आले असून यातील ८५० हून अधिक प्रकरणे मिटवण्यात यश आले आहे.

परदेशात कामानिमित्त गेलेल्या महिलांचा छळ होत असल्याच्या तक्रारीही या विभागाकडे येत असतात. ही प्रकरणे गंभीर्याने घेत, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीने परदेशातून या महिलांची सुटका करण्यात आली आहे. परदेशात कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेली प्रकरणेही निकाली काढण्यात आली आहेत. ही जबाबदारी पार पाडत असताना, कविता लिहिण्याची कलादेखील शिंदे जोपासतात. महिलांशी संबंधित प्रकरणांचे प्रतिबिंब या कवितांमध्ये उमटत असलेले दिसते. यासह बचत गट, शाळा-कॉलेजे येथे कायदेविषयक प्रबोधन व स्वसंरक्षण यांचे धडे देण्यासाठी तेजश्री शिंदे कार्यरत आहेत.

### समाधान मोलाचे...

पोलिस ठाण्यात तक्रारदाराला न्याय देण्यासाठी मन कठीण करावे लागते, मात्र कौटुंबिक वाद हाताळताना हळुवारपणे, संवेदनशीलतेने समजवावे लागते, असे त्या सांगतात. महिलांशी संबंधित प्रकरणे निकाली काढल्याने केवळ ती महिलाच नव्हे, तर तिचे संपूर्ण कुटुंब सुखी होते. अनेक महिला वाद मिटल्यानंतरही संपर्कात राहतात, मनापासून आभार मानतात, हे समाधान मोलाचे आहे, असे शिंदे आवर्जून सांगतात.

महिला दि

2) लोकमत पृ. पान क्र. 1

# भाईंदरमध्ये शिवजयंती कार्यक्रमावरून ठाकरे-शिंदे गट आले आमने-सामने

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेला नवघर मार्ग, स्नेहा गल्लीच्या नाक्यावर शिवजयंती साजरी करण्यावरून शिवसेनेचा शिंदे गट व ठाकरे गट आमने - सामने आले आहेत. ठाकरे गटाच्या अर्जावर पोलिसांनी परवानगी दिल्यानंतर त्यास शिंदे गटाने आक्षेप घेत त्याच ठिकाणी शिवजयंती साजरी करण्याची मागणी केल्याने वाद निर्माण झाला आहे. पक्ष, कार्यालये व शाखा ताबा घेण्याचे भांडण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीपर्यंत पोहोचले आहे.

स्नेहा गल्लीच्या नावयावर शिवसेनेच्या वतीने दरवर्षी शिवजयंती साजरी केली जाते. तेथे मंडप उभारून शिवप्रतिमेचे पूजन केले जाते. शिवजयंती साजरी करण्याकरिता नवघर पोलिसांना पत्र दिले जायचे. यंदा १० मार्च रोजी शिवजयंती साजरी करण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून ठाकरे गटाच्या महिला उपजिल्हा संघटक जयलक्ष्मी सावंत व उपशहर प्रमुख राजाराम सावंत यांनी नवघर पोलिस, महापालिका, वाहतूक पोलिस आदींना अर्ज दिले.

नवघर पोलिस व वाहतूक शाखेने ४ मार्च रोजी पालिकेच्या प्रभाग अधिकारी यांना परवानगी देण्याबद्दल नाहरकत पत्र दिले. सोमवारी सावंत हे प्रभाग समिती कार्यालयात पालिकेच्या परवानगी शुल्काची पावती फाडण्यास गेले असता त्यांना शुल्क भरल्याची पावती व परवानगी देण्यास नकार दिला. शिवसेनेत असलेले विभागप्रमुख संतोष धामणकर हे शिंदे गटात असून, त्यांनी गेल्या वर्षी त्याच जागी शिवजयंती साजरी केल्याने यंदाही आपणास परवानगी देण्याची मागणी केली. परवानगी रोखल्याने ठाकरे गटाच्या उपजिल्हा संघटक जयलक्ष्मी सावंत यांनी नाराजी व्यक्त केली. यंदा धामणकर यांनाच परवानगी दिली पाहिजे, असे शिंदे गटाचे पदाधिकारी राजेश वेतोस्कर यांनी सांगितले. वरिष्ठ निरीक्षक मिलिंद देसाई यांनी दोन्ही गटांची बैठक बोलावली आहे.

### दहीहंडीवरूनदेखील झाला होता वाद

स्नेहा गल्ली नाक्यावर अनेक वर्षांपासून शिवसेनेचे माजी नगरसेवक दिनेश नलावडे हे दहीहंडीचे आयोजन करतात. गेल्या वर्षी ठाकरे गटाचे नलावडे यांचे एकेकाळचे कट्टर समर्थक असलेले माजी नगरसेवक राजेश वेतोस्कर शिंदे गटात गेल्यावर त्यांनीदेखील त्याच जागी दहीहंडीची परवानगी मागितली होती. त्यावेळी पोलिसांनी नलावडे यांना त्याच जागी तर वेतोस्कर यांना काही अंतरावर दहीहंडी लावण्यास परवानगी देऊन वाद मिटवला होता.

CS CamScanner

Scanned with CamScanner

३) म.टा. पान क्र. 2

दि. 08/03/2023

# ‘पॅनकार्ड’द्वारे फसवणूक

## अपडेटच्या नावाखाली सायबरचोरांची नवी शक्कल; पोलिसांकडून दखल

- लिंक आणि अॅपच्या माध्यमाचा वापर
- आठवडाभरात दोन डझनहून अधिक गुन्हे
- पोलिसांकडून सावधगिरी बाळगण्याच्या सूचना

**दीपेश मोरे**
dipesh.more@timesgroup.com

**मुंबई :** मार्च महिना आला की, प्राप्तिकर, पॅनकार्ड, आर्थिक तजवीज हे विषय चर्चेला येतात. हाच धागा पकडत सायबर चोरांनी पुन्हा एकदा फसवणुकीसाठी पॅनकार्डचा वापर सुरू केला आहे. बँक खात्याशी पॅनकार्ड लिंक नसल्याचे सांगून ते अपडेट न केल्यास बँक खाते बंद होईल, असे भासविले जाते. ऑनलाइन अपडेट करण्यास सांगून लिंक, अॅपच्या

मटा विशेष

माध्यमातून लाखो रुपयांची फसवणूक केली जात आहे. मुंबईत आठवडाभरात पॅनकार्ड फसवणुकीचे दोन डझनहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे पोलिसांनीदेखील सायबर चोरांच्या या गुन्हेपद्धतीची दखल घेत सावधगिरी बाळगण्याच्या सूचना दिल्या आहेत.

गोरेगाव पूर्वेकडील ओबेरॉय वुड्स येथे राहणाऱ्या ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइलवर एक संदेश आला. बँक खात्यासोबत तुमचे पॅनकार्ड अपडेट नसल्याने तुमचे नेट बँकिंग ब्लॉक करण्यात येत आहे, असे नमूद करताना सोबत एक लिंकदेखील पाठविण्यात आली होती. या लिंकवर जाऊन पॅनकार्ड आणि बँक खात्याचा तपशील भरल्यास ऑनलाइन घरबसल्या अपडेट करता येते, असेही या संदेशात म्हटले होते. त्यानुसार वृद्धाने लिंकवर जाऊन आपल्या तिन्ही बँक खात्यांना पॅनकार्ड जोडण्यास सुरुवात केली. पहिल्याच खात्याला जोडत असताना ९९ हजार ९९८ रुपये वजा झाले. इतर दोन खात्यांना पॅनकार्ड जोडत असताना आणखी तीन लाख रुपये वजा झाले.



### हा संदेश टाळा

प्रिय ग्राहक, तुमचे बँक खाते क्रमांक काही वेळातच बंद करण्यात येणार आहे. आपल्या खात्याला पॅनकार्ड लिंक केलेले नाही. खाते बंद होणे टाळण्यासाठी दिलेल्या लिंकवर क्लिक करा आणि घरबसल्या अपडेट करा.

### फसवणुकीचे सायबर गुन्हे

| वर्ष | गुन्हे | उकल |
|---|---|---|
| २०१७ | १,१९३ | २६३ |
| २०१८ | १,३२९ | ३५८ |
| २०१९ | २,५१८ | ३८४ |
| २०२० | २,४३५ | २०७ |
| २०२१ | २,८८३ | ४५५ |
| २०२२ | ४,७१८ | ३४६ |



### सावधगिरी

- पॅनकार्ड अपडेटच्या संदेशातील क्रमांकावर संपर्क करू नका.
- बँकेत किंवा ज्या कार्यालयाचा उल्लेख असेल त्या ठिकाणी प्रत्यक्षात जा.
- वेळ वाचेल म्हणून ऑनलाइन कोणतीही माहिती पुरवू नका.
- अपडेटसाठी कोणत्याही लिंकवर जाऊ नका.
- अॅनी डेस्क, टीम व्ह्यूअर यांसारखे अॅप डाउनलोड करणे टाळा.
- असे संदेश आणि फोन यातून आर्थिक फसवणूक होऊ शकते हे लक्षात ठेवा.
- सार्वजनिक वायरलेस नेटवर्कचा वापर टाळा.

### पॅनकार्ड फसवणुकीच्या घटना

- **चेंबूर :** ६२ वर्षीय व्यक्तीच्या खात्यामधून एक लाख परस्पर वळविले.
- **चुनाभट्टी :** पॅनकार्डसाठी लिंक पाठवून ६६ हजार काढले.
- **वनराई :** खाते बंद होण्याची भीती दाखवून ८४ हजार रुपये काढून घेतले.
- **मालाड :** एचडीएफसी बँकेची लिंक भासवून ९९ हजार रुपयांची फसवणूक.
- **ट्रॉम्बे :** पॅनकार्ड अपडेट करण्याच्या बहाण्याने ९९ हजार ९९९ रुपयांचा गंडा.
- **कफ परेड :** ऑनलाइन २८ हजार रुपये परस्पर वळविले.
- **चेंबूर :** बँकेतून बोलत असल्याचे सांगत अपडेटच्या नावाखाली ९९ हजार ९५० रुपये काढले.
- **विक्रोळी :** खोटी लिंक पाठवून ९९ हजारांची फसवणूक.
- **घाटकोपर :** पॅनकार्ड अपडेटचा संदेश तरुणाला एक लाखाला पडला.
- **अंधेरी :** चलाखीने ओटीपी घेऊन बँक खात्यातून एक लाख रुपये काढले.

---

४) पुढारी पान क्र. 4

# होळीच्या दिवशीच पत्नीला पेट्रोलने जाळले

## आरोपी पतीला तुळींज पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील प्रगतीनगर नालासोपारा येथे राहणाऱ्या राहणाऱ्या पतीने पत्नीला पेट्रोल टाकून जाळल्याची घटना घडली आहे. यात घटनेत पत्नी ७० टक्के भाजली असून तिला जे जे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. आरोपी आरोपी पतीला अटक करण्यात आली आहे.

नालासोपारा पूर्वेच्या शुभम अपार्टमेंट, प्रगती नगरमध्ये संतोष पांचाळ हा पत्नी अनिषा हिच्यासह राहत असून त्यांची ही दुसरी पत्नी आहे. या दोघांमध्ये सोमवारी होळीच्या दिवशी संध्याकाळी सातच्या सुमारास सुरू भांडण झाले. संतोष याला त्याच्या पत्नीला घराबाहेर काढायचे होते त्यामुळे तो घर सोडून जाण्यास सांगत होता. ती घर सोडून जाण्यास तयार होत नव्हती यावरून त्यांच्या दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाले. संतोष हा रिक्षा चालक असल्यामुळे त्याच्या रिक्षामध्ये बाटलीत पेट्रोल ठेवलेले होते. त्याने पेट्रोल घेऊन त्याच्या पत्नीच्या अंगावर टाकून तिला पेटवून दिले.

दरम्यान, तिला जे जे रुग्णालयात दाखल करण्यात आले असून ती ७० टक्के भाजली असल्याचे सांगण्यात येत आहे. संतोष व अनिषा यांना तीन लहान मुली आहेत, तर पहिल्या पत्नीच्या दोन्ही मुलींची लग्न झालेली असल्याची माहिती मिळाली आहे. आरोपी संतोष पांचाळ याला मंगळवारी सायंकाळी अटक करण्यात आली आहे.

होळीचा सण हा मोठ्या आनंदाने साजरा केला जात असताना सगळीकडे होळी पेटवली जात होती त्याचवेळेस पतीने पत्नीला पेट्रोल टाकून पेटवून दिल्यामुळे दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

५) लोकमत पू. पान क्र.4

दि. 08/03/2023

# इथे गाडी पार्क कराल तर भरावा लागेल सातशे ते बाराशेचा दंड !

## मीरा-भाईंदरमध्ये तीन महिन्यांत २० लाख ६५ हजारांचा दंड वसूल

रिॲलिटी चेक

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमध्ये नो पार्किंग क्षेत्रात सर्रास बेकायदा पार्किंग केली जाते. वाहतूक पोलिसांनी दोन महिन्यांत तीन हजार ४७१ वाहनांवर कारवाई करून २० लाख ६५ हजारांचा दंड वसूल केला आहे. वाहतूक शाखेकडे दुचाकी वाहने उचलून नेण्यासाठी टोइंग वाहने आहेत. पण, ती वाहने अपुरी असून मनुष्यबळही कमी आहे. तसेच चारचाकी मोटार, रिक्षा व अवजड वाहनांवर कारवाई करण्यासाठी पुरेसे जॅमरही नाहीत. त्यामुळे कारवाई करताना वाहतूक पोलिसांना अडचणीचे ठरत आहे.

दुचाकी टोइंग करून पालिकेने दिलेल्या भूखंडात ठेवल्या जातात. हे भूखंडही मोजकेच व दूर आहेत. त्यामुळे दुचाकी नेण्यात आणि परत आणण्यात मोठा वेळ जातो.



### पोलिसदादा, इकडेही थोडे लक्ष द्या

**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग :** काशिमीरा नाका ते भाईंदर फाटका पर्यंतचा 'छत्रपती शिवाजी महाराज मार्ग', काशिमीरा नाका येथे नो-पार्किंग असूनही पोलिसांच्या नाकावर टिच्चून बेकायदा पार्किंग केली जाते. मीरा रोड स्थानक परिसरातही राजरोस बेकायदा पार्किंग केले जात आहे.

### ...तर ७०० ते १२०० रुपयांचा दंड

**दुचाकीसाठी :** ५०० रुपये दंड आणि २०० रुपये टोइंग मिळून ७०० रुपये.

**तीनचाकी/चारचाकी मोटारींसाठी :** ५०० रुपये दंड आणि ३०० रुपये टोइंग असे ८०० रुपये.

**अवजड वाहनांसाठी :** ५०० रुपये दंड आणि ७०० रुपये टोइंग मिळून १२०० रुपये.

महापालिका गोदामात कारवाई केलेल्या चारचाकी वाहनांवर तीन हजारांचा दंड आकारते.

नो पार्किंगचे उल्लंघन करून रहदारीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर वाहतूक पोलिस सातत्याने कारवाई करत आहेत. चालकांनी जबाबदारी ओळखून नियमांचे पालन केले पाहिजे. कारवाई केलेली वाहने उभी करण्यासाठी जवळपास जागा पालिकेने दिल्यास कारवाईचा वेग वाढेल.

- देवीदास हंडोरे,
पोलिस निरीक्षक,
मीरा-भाईंदर, वाहतूक शाखा

### दोन महिन्यांत २० लाखांपेक्षा जास्त दंड वसूल

मीरा-भाईंदर वाहतूक शाखेने जानेवारीत नो पार्किंगप्रकरणी १,५१२ प्रकरणे करून आठ लाख ३५ हजारांचा दंड तर फेब्रुवारीत १,९५९ वाहनांवर कारवाई करून १२ लाख ३० हजार ५०० असा एकूण २० लाख ६५ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

६) लोकमत पान क्र.10

## फुगा मारण्याच्या वादातून दुखापत

नालासोपारा : पाण्याचा फुगा अंगावर मारण्याच्या वादातून तीक्ष्ण हत्याराने गंभीर दुखापत केल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे. संकेश्वरनगर येथील रॉयल प्लाझा बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या प्रथम सुरेश गुप्ता याचा मित्र रोहन तुकाराम आजगावकर याच्या अंगावर पाण्याचा फुगा मारल्याच्या वादातून विशेष तिवारी व त्याच्या आई - वडिलांसोबत भांडण सुरू होते. यावेळी त्याला वाचवण्यासाठी गेलेल्या प्रथम गुप्तावर व रोहन आजगावकर याच्यावर विशेष तिवारी यांनी बर्फ फोडण्याच्या टोच्याने वार करून त्याला गंभीर जखमी केले होते. रविवारी आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

७) लोकमत पान क्र.10

## गळफास घेऊन आत्महत्या



नालासोपारा : वसईत २६ वर्षीय तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. नायगावच्या रश्मी फिल्म सिटी येथे राहणाऱ्या यशिका यशपाल गेहलोत या तरुणीने रविवारी पहाटे तीनच्या सुमारास नैराश्यापोटी बेडरूममधील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 08/03/2023

8) लोकसत्ता पृ.पान क्र.1

# शहरात होळी, धुळवड उत्साहात

**लोकसत्ता वार्ताहर**



**वसई:** वसई, विरार शहराच्या विविध ठिकाणच्या भागात होळी आणि धुळवड मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सोमवारी शहरी व ग्रामीण भाग मिळून अनेक गाव पाड्यात होळीचे पूजन करण्यात आले. शहराच्या विविध भागात, सोसायट्यांच्या आवारात तर ग्रामीण भागात मोकळ्या जागेत होळ्या लावल्या होत्या. तर काही गावात 'एक गाव एक होळी' परंपरा कायम ठेवत होळी साजरी करण्यात आली.

वसई, जूचंद्र, नारंगी, नायगाव कोळीवाडा, कोळीवाडे कामण, गोखीवरे, विरार यांसह इतर ठिकाणच्या गावागावांत पारंपरिक पद्धतीने होळ्या उभारण्यात आल्या होत्या. या होळीच्या निमित्ताने लहान मुले, महिला वर्ग, पुरुष मंडळी पारंपरिक व शांत सार्वजनिक ठिकाणच्या होळी उत्सवात सहभागी झाले. गावातील नवविवाहित दाम्पत्यही होळीभोवती फेऱ्या मारताना दिसून आले. तर होळीचे पूजन झाल्यानंतर प्रसाद घेण्यासाठी सर्वांचीच झुंबड उडाली होती. तसेच रात्री विविध ठिकाणी मनोरंजनात्मक खेळ, नृत्य, होळीची पारंपरिक गीते, नाट्यमय कार्यक्रम सादर करण्यात आले या कार्यक्रमात अनेकांनी विविध प्रकारच्या पारितोषिकांची लयलूटही केली. मात्र रात्रीच्या सुमारास अवेळी पडलेल्या पावसामुळे काही होळी सणानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमावर विरजण पडले. त्यामुळे नागरिकांचा हिरमोड झाला.

होळीनंतरच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवारी विविध ठिकाणी सकाळपासूनच धूलिवंदनला सुरुवात झाली. लहान मुलांनी एकमेकांना रंग लावण्यासाठी, फुगे उडविण्यासाठी चांगलीच धावपळ सुरू होती. तर काही भागात ढोल ताशा व बेंजो व डीजेच्या तालावर नृत्य करीत धुळवड साजरी केली जात होती. काहींनी वेशभूषा साकारून शिमग्याची विविध प्रकारची सोंगे करून गावागावांत नाचताना दिसून आले. त्यामुळे वसई विरार हे होळी व धुळवडीनिमित्ताने चांगलेच रंगमय झाले होते. अनेक ठिकाणी धुळवडीनिमित्त खासगी पार्ट्यांचे आयोजन करण्यात आले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

9) म.टा. पृ.पान क्र.1

# चिलडमुळे वाहने घसरली

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

भाईंदरच्या उत्तन मार्गावर कचरा गाडीतून गळणाऱ्या पाण्यावरून (लिचड) घसरून मंगळवारी सकाळी अनेक दुचाकींचा अपघात झाला. या घटनेची माहिती मिळताच, अग्निशमन दलाकडून रस्ता पाण्याने स्वच्छ करण्यात आला.

शहरात दररोज तयार होणारा कचरा उत्तन डोंगरी येथील कचरा प्रकल्पात टाकला जातो. भाईंदरहून ओला कचरा घेऊन जाणाऱ्या वाहनातून आनंद नगर डोंगरी ते भूत बंगला या मार्गावर मंगळवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास कचऱ्यातून निघणारे पाणी (लिचड) मोठ्या प्रमाणावर गळले होते. यावरून घसरल्याने अनेक दुचाकी वाहनांचा अपघात झाला. यात काही दुचाकीस्वार जखमी झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

अग्निशमन दलाने पाण्याचा फवारा म्हणून रस्ता स्वच्छ केला. अशा घटना वारंवार घडत असल्याने उत्तनवासीयांनी नाराजी व्यक्त केली आहे. एखादा गंभीर अपघात घडल्यानंतर प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी त्यांच्याकडून केली जात आहे.

10) पुढारी पृ. पान क्र.3

# काशिमिरामध्ये अमलीपदार्थ तस्करांना ठोकल्या बेड्या

## ५५ लाखांचे मॅफेड्रॉन जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमलीपदार्थ तस्करी करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईत ५५ लाख रुपयांचा २७५ ग्रॅम मॅफेड्रॉन अमलीपदार्थ जप्त करण्यात आले. सदर कारवाई अमलीपदार्थविरोधी कक्षाने कारवाई केली.

मिरा भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात होळी व धुलिवंदन सणाचे अनुषंगाने अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या ईसमांविरुध्द कारवाई करण्याच्या वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. मिळालेल्या सुचना व मार्गदर्शनप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. अमर मराठे यांचे नेतृत्वाखाली अधिकारी व अंमलदार हे मिरारोड, नवघर, भाईंदर परिसरात गस्त करीत असताना फाउंटन हॉटेलच्या समोरील रोडवर, घोडबंदर, काशिमीरा या ठिकाणी दोन इसम संशयास्पद स्थितीत आढळून आले. त्यावेळी त्या ईसमांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी आपापली नावे सुलतान अब्दुल कादर कारेगल व बाहुद्दीन निजामुद्दीन कादरी (दोन्ही राहणार मुंब्रा ठाणे) असल्याचे सांगितले.

चौकशीदरम्यान त्या दोघांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे १३० ग्रॅम वजनाचा असा एकुण २७५ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन हा अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगला असल्याचे निदर्शनास आले. या आरोपींविरुद्ध एन. डी. पी. एस कायदा अन्वये काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी कक्ष करत आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. ०८/०३/२०२३

१) पुढारी पान क्र. १

# खेड पोलिसांनी रेल्वे थांबवून लावला अपहरण नाट्याचा छडा

## काशिमिरा येथील बेपत्ता मुलींना मांडवी एक्स्प्रेसमधून घेतले ताब्यात

**खेड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोडमधील काशिमीरा पोलिस ठाणे येथे अपहरणाची नोंद झालेल्या तीन बेपत्ता अल्पवयीन मुलींना खेड पोलिसांनी माहिती मिळताच अवघ्या तासाच्या आत मंगळवार दि. ७ रोजी खेड रेल्वे स्थानकात थांबलेल्या मांडवी एक्स्प्रेसमधून ताब्यात घेतले. दरम्यान, मुलींचे पालक त्यांना नेण्यासाठी निघाले आहेत. खेड पोलिसांच्या या कामगिरीबद्दल विशेष कौतुक होत आहे.



खेड : खेड पोलिसांनी मांडवी एक्स्प्रेसमधून ताब्यात घेतलेल्या तीन मुली.

खेड पोलिस ठाण्यात दि. ७ रोजी रोजी सकाळी ११.३० वाजता दूरध्वनीद्वारे मीरा - भाईंदर वसई विरार आयुक्तालयाकडून खेड पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक, सुजीत गडदे यांना काशिमीरा पोलीस ठाणे पोलीस ठाण्यात तीन अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल झाल्याचे समजले. यातील तिन्ही मुलींचे मोबाईल लोकेशन कोकण रेल्वेमार्गे धावणाऱ्या मांडवी एक्स्प्रेसमध्ये पोलिसांना दाखवत होते. ही गाडी खेडच्या दिशेने येत असल्याची माहिती खेड पोलिसांना मिळताच या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत सहाय्यक पोलिस निरीक्षक सुजीत गडदे यांनी दोन पोलिस अधिकारी व ८ अंमलदार यांचे एक वेगळे पथक तयार केले. दुपारी १२.०५ वाजता खेड रेल्वे स्थानक येथे येणाऱ्या मांडवी एक्स्प्रेसच्या तपासणीसाठी रेल्वे प्रशासनासोबत समन्वय राखून ५ मिनिटे अधिक कालावधीकरिता खेड रेल्वे स्थानकावर थांबविण्यात आली. होळीमुळे कोकणामध्ये जाण्या-येण्यासाठी प्रवाशांची रेल्वे गाड्यांसाठी गर्दी करत असतात, याची पूर्ण कल्पना तसेच वेळेची मर्यादा असतानाही या तिन्ही मुलींचा मांडवी एक्सप्रेमध्ये पोलिसांकडून कसून शोध घेण्यात आला. अखेरीस या मुली, रेल्वेच्या एका कोचमध्ये बसलेल्या सापडल्या. या तिन्ही मुलींना खेड पोलिस ठाण्यात सुखरूप आणण्यात आले. या मुलींकडे अधिक चौकशी केली असता या मुली त्यांचे घरा शेजारील गार्डनमध्ये फिरण्यासाठी गेल्या होत्या व त्यांना घरी जाण्यााठी उशीर झाल्याने आपले पालक आपल्याला आता ओरडतील, या भीतीने त्या निघाल्या असल्याचे वास्तव समोर आले.

या तिन्ही मुलींना त्यांच्या पालकांकडे सुपूर्द करण्याकरिता काशिमिरा पोलिस ठाण्याचे पथक खेड पोलिस ठाणे येथे येण्यासाठी रवाना झाले आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

# In Short

## मीरा रोड येथे महिला दिन साजरा

। मीरा रोड : मीरा रोड येथील वोक्हार्ट रुग्णालयाने दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. रुग्णालयाने त्यांच्या 'आय ॲम फियरलेस' उपक्रमाद्वारे 'महिलांचे हक्क आणि सक्षमीकरण' या विषयावर सत्रे आयोजित केली होती. महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळाही घेण्यात आली. या कार्यक्रमात मीरा-भाईंदर परिसरातील सुमारे १०० महिलांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचा उद्देश महिला सक्षमीकरण हा होता. आमदार गीता जैन, डॉ. अजय दुबे (अध्यक्ष, बेटी बचाओ बेटी पढाओ), यास्मिन सिद्दिकी (क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट), मानसी श्रोती (समन्वयक प्रकल्प, आरोग्य आणि पोषण एन वॉर्ड, मुंबई), नेहा सिंग (पत्रकार) आणि इतर समाजवादी आणि आरोग्य तज्ज्ञ उपस्थित होते. महिला सशक्तीकरण म्हणजे महिलांचे जीवन आणि कार्य यांचा निर्णय घेण्याची क्षमता. महिलांनाही वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, कायदेशीर क्षेत्रात समान अधिकार दिले पाहिजेत. महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कुटुंबात समतोल राखत आहेत.

Scanned with CamScanner

पुढारी

# काशिमिरामध्ये अमलीपदार्थ तस्करांना ठोकल्या बेड्या

## ५५ लाखांचे मॅफेड्रॉन जप्त

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

काशिमिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमलीपदार्थ तस्करी करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. या कारवाईत ५५ लाख रुपयांचा २७५ ग्रॅम मॅफेड्रॉन अमलीपदार्थ जप्त करण्यात आले. सदर कारवाई अमलीपदार्थविरोधी कक्षाने कारवाई केली.

मिरा भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात होळी व धुलिवंदन सणाचे अनुषंगाने अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या ईसमांविरुध्द कारवाई करण्याच्या वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. मिळालेल्या सुचना व मार्गदर्शनप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पो.नि. अमर मराठे यांचे नेतृत्वाखाली अधिकारी व अंमलदार हे मिरारोड, नवघर, भाईंदर परिसरात गस्त करीत असताना फाउंटन हॉटेलच्या समोरील रोडवर, घोडबंदर, काशिमीरा या ठिकाणी दोन इसम संशयास्पद स्थितीत आढळून आले. त्यावेळी त्या इसमांना ताब्यात घेतले. त्यांची चौकशी के ली असता त्यांनी आपापली नावे सुलतान अब्दुल कादर कॉरंगल व बाहुद्दीन निजामुद्दीन कादरी (दोन्ही राहणार मुंब्रा ठाणे) असल्याचे सांगितले.

चौकशीदरम्यान त्या दोघांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे १३० ग्रॅम वजनाचा असा एकुण २७५ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीसाठी बाळगला असल्याचे निदर्शनास आले. या आरोपींविरुद्ध एन. डी. पी. एस कायदा अन्वये काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी कक्ष करत आहे.

My Thane Edition
Mar 8, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

लोकमत



वसई तालुक्यात पारंपरिक पद्धतीने होळी साजरी करताना नागरिक.

# वसईत पारंपरिक पद्धतीने होळी, धुळवड साजरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वसई-विरार शहरात होळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. मंगळवारी धुळवडही मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. समुद्रकिनाऱ्यांवर धुळवड साजरी करण्यासाठी गर्दी झाली होती, तर कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी शहरात जागोजागी बंदोबस्त तैनात केला होता.

वसईच्या ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने होळीचा सण साजरा केला जातो. सुपारीची होळी आणल्यानंतर तिला हळद लावण्यात आली. त्यानंतर होळी देवतेचे स्नान करून तिचा शृंगार करून तिची ओटी भरण्यात आली. होळीची विधिवत पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखवल्यानंतर सोमवारी रात्री उशिरा होळी पेटवण्यात आली.

धुळवडीसाठी वसई-विरारमधील रिसॉर्ट काही दिवसांअगोदरच बुक करण्यात आले होते. शहरातील अनेक इमारतींच्या आवारात मंगळवारी धुळवड साजरी झाली, मात्र अनेक ठिकाणी फुग्यांऐवजी प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असलेला दिसून आला. धुळवडीत लोकांनी नैसर्गिक रंगांचा वापर केला.



Scanned with CamScanner